दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hindupraksashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दिवाळीची सुट्टी; शिक्षण विभागाचे परिपत्रक जाहीर

मुंबई : राज्य सरकारच्या माध्यमिक शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील शाळांच्या सत्रांची रचना आणि विविध सुट्ट्यांबाबत अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या परिपत्रकानुसार विद्यार्थी व शिक्षकांसाठी दिवाळीची दीर्घ सुट्टी सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ ते शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राहील. या १३ दिवसांच्या सुट्टीच्या काळात दिवाळी सणाचे महत्त्वाचे दिवस येतात. यामध्ये धनत्रयोदशी- ६ नोव्हेंबर २०२६ दिवाळी पाडवा / बलिप्रतिपदा- १० नोव्हेंबर २०२६ भाऊबीज- ११ नोव्हेंबर २०२६ या सार्वजनिक आणि स्थानिक सुट्ट्यांचा समावेश दिवाळीच्या या दीर्घ सुट्ट्यांमध्येच करण्यात आला आहे.

बॉम्बस्फोटाचा बनावट व्हिडिओ; बिहारमधील मजुराला अटक

बंगळूर: कर्नाटकातील बंगळूर येथील विधान सौधमध्ये बॉम्बस्फोट झाल्याचा दावा करणारा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) मदतीने तयार केलेला बनावट व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी बिहारमधील एका मजुराला अटक केली आहे. अली असे आरोपीचे नाव असल्याचे वृत्त आहे. या प्रकरणी पोलिसांनी एफआयआर दाखल केला असून, व्हिडिओ तयार करण्यामागील हेतू जाणून घेण्यासाठी आरोपीची चौकशी सुरू आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १८० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

पेमेंट ॲप्स बनले आर्थिक सोबती

बेंगळुरू: पहले इंडिया फाउंडेशनने आज ॲमेझॉन पेसोबत सहयोगाने 'हाऊ अर्बन इंडिया पेज रिपोर्ट २०२६' प्रसिद्ध केला. २० राज्यांमधील १०० शहरांतील ५,१४९ ग्राहक आणि १,०५४ व्यापाऱ्यांच्या सर्वेक्षणावर आधारित या अहवालातून निदर्शनास आले आहे की, डिजिटल पेमेंट्स दैनंदिन सवय बनली आहे आणि खर्चाच्या सहापैकी पाच श्रेणींमध्ये यूपीआय आघाडीवर आहे. अहवालात डिजिटल क्रेडिट इन्क्लुजन इंडेक्स (डीसीआयआय) २०२६ सादर करण्यात आला आहे, जो देशाच्या डिजिटल क्रेडिट प्रवासाचा सर्वसमावेशक दृष्टिकोन मांडणारा भारताचा पहिला संमिश्र बेंचमार्क आहे. हा निर्देशांक भारताला १०० पैकी ५५.८५ एकूण स्कोअर देतो, ज्यामुळे भारत "इमर्जिंग ॲंड सक्सेर्ड" (५१ ते ७५) श्रेणीत येतो.

नॉर्डिट्रॉपिन च्या किमतीत 35% कपात

बेंगळुरू - ग्रोथ हार्मोनची कमतरता असलेल्या भारतातील लहान मुलांसाठी आणि प्रौढांसाठी नोव्हो इंडियाने आज नॉर्डिट्रॉपिन® फ्लेक्सप्रो® च्या किमतीत 35% पर्यंत मोठी कपात जाहीर केली आहे. आजपासून लागू होणाऱ्या या निर्णयानुसार, हे नाविन्यपूर्ण ग्रोथ हार्मोन थेरपी औषध दोन वेगवेगळ्या डोस क्षमतांमध्ये – 10 मिग्रॅ आणि 15 मिग्रॅ - भारत-केंद्रित नवीन किमतींमध्ये उपलब्ध होईल.भारतात वाढीच्या समस्या असलेल्या लोकांना आवश्यक उपचार सहज आणि कमी खर्चात मिळावेत, यासाठी नोव्होने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. हे पाऊल नोव्होच्या कटिबद्धतेचा एक भाग आहे.

'टोयोटा-ई-कक्षा' मोबाइल संगणक बस सुरू

सुरत : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी सुरत जिल्हा पंचायतीच्या सहकार्याने आज 'टोयोटा-ई-कक्षा' या मोबाइल संगणक बस उपक्रमाचा प्रारंभ केला. जिल्ह्यातील सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवणे आणि त्यांना मूलभूत माहिती तंत्रज्ञानाचे (आयटी) शिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. गुजरातचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. हर्ष संघवी यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुरत जिल्हा पंचायतीचे जिल्हा विकास अधिकारी श्री. देवेंद्र प्रकाश मीना (आयएएस) तसेच टोयोटा किर्लोस्कर मोटरचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी बाजारात

मुंबई : 'महिंद्रा ॲंड महिंद्रा लिमिटेड'च्या ऑटोमोटिव्ह व्यवसायाचे अध्यक्ष डॉ. वेलुसामी आर. म्हणाले, "'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'चे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही तडजोड न करता उत्तम अनुभव देणे. आजच्या ग्राहकांना 'एसयूव्ही'मधील प्रशस्त जागा, आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि उत्तम ड्रायव्हिंगचा अनुभव हवा असतो. त्याच वेळी सीएनजीमुळे इंधनावरील खर्चही कमी व्हावा, अशी त्यांची अपेक्षा असते. या गाडीत तिच्या श्रेणीतील सर्वोत्तम टॉर्क, टर्बोचार्ज्ड इंजिनची कामगिरी आणि प्रभावी मायलेज यांचा संगम आहे. त्यामुळे 'सीएनजी'ची किफायतशीरता आणि एसयूव्ही चालवण्याचा आनंद या दोन्ही गोष्टी एकाच गाडीत मिळतात.

'केस नं. 99'वर्ल्ड डिजिटल प्रीमियरची उत्सुकता

मुंबई, : मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण करणारे अजय पुरकर आता दिग्दर्शनाच्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहेत. अजय पुरकर आणि सई अजय पुरकर दिग्दर्शित 'केस नं. ९९' या आगामी मराठी सस्पेन्स-थ्रिलरचा ट्रेलर आणि पोस्टर आज प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून दिग्दर्शनाच्या क्षेत्रात नवी वाटचाल सुरू करत अजय पुरकर यांनी एका रहस्यमय आणि उत्कंठावर्धक कथेला पडद्यावर मांडले आहे. या चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर १६ ऑक्टोबर २०२६ रोजी अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर होणार आहे.




मनपाकडून 29 अनधिकृत नळजोडण्या खंडित; पाणी चोरी रोखण्यासाठी मुख्य जलवाहिन्यांवर धडक कारवाई; कारवाई तीव्र करण्याचा प्रशासनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि पाणी चोरी रोखण्यासाठी महानगरपालिकेने गुरुवारी (दि. २२) अनधिकृत नळजोडण्यांविरोधात कारवाई केली. या मोहिमेत मुख्य जलवाहिन्यांवरील एकूण २९ अनधिकृत नळजोडण्या खंडित करण्यात आल्या.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त-२ कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.





कट-कट गेट परिसरातील हॉटेल शालिमारजवळ ४०० मिमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवरून घेतलेली एक अनधिकृत जोडणी तोडण्यात आली. तर पायलट बाबा नगरी आणि संतोषी माता नगर परिसरात २५० मिमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवरील २८ अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई करण्यात आली.

मुख्य जलवाहिन्यांवरून बेकायदा पाणी उपसा केल्याने शहरातील नियमित पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनधिकृत जोडण्यांविरोधात मनपा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय आणि बेकायदा पाणी उपसा सहन केला जाणार नसून, यापुढेही ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे. संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

कार्यकारी अभियंता दत्तात्रय गायकवाड, पथकप्रमुख रोहित इंगळे, उपअभियंते आनंद राजपूत व महेश चौधरी, अभियंते कल्याण सातपुते व अक्षय दुकले, पथक कर्मचारी आणि नागरी मित्र सुरक्षा पथकाच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली.

काँग्रेसचे, मत वाचवा, देश वाचवा, अभियान अंतर्गत आंदोलन

आंदोलनात महाराष्ट्र सह प्रभारी रेहाना चिस्ती यांची उपस्थिती

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



परभणी**काँग्रेसचे नेते व सर्व राहुल गांधी यांच्या नेतृत्वात देशभरामध्ये चालू असलेल्या मत वाचवा देश वाचवा याचाच भाग म्हणून शहरांमध्ये काँग्रेस तर्फे यावर अंतर्गत शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने 22 ऑक्टोबर गुरुवार रोजी महाराष्ट्र सह प्रभावी रेहाना चिस्तीयांच्या नेतृत्वाखाली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ मतदारांच्या विविध प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी निषेध आंदोलन करण्यात आले.

यामध्ये मतदार यादी मधील मनमानी फेरबदल तात्काळ थांबवावेत एस आय आर चे प्रक्रियेचे पारदर्शक पद्धतीने पुनर निरीक्षण करावे एकही पात्र मतदाराच्या हक्काचा मतदानाचा हक्क वंचित राहू नये नाव वगण्यात आलेल्या मतदारांना नोटीस देऊन आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी आणि मतदार यादीतील प्रत्येक बदलाची माहिती जनतेला उपलब्ध करून द्यावे अशा प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले होते यावेळी प्रदेश सचिव स्मिता शहापूरकर माजी आमदार सुरेश देशमुख शहर जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख उपमहापौर भगवान गणेश देशमुख माजी उपमहापौर भगवानराव वाघमारे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख जिप सदस्य अजित वरपूडकर मनपा सदस्य नदीम इनामदार सुनील देशमुख नदीम भाई अमोल जाधव आडूखान मसुखान अब्रार इलाही रवी सोनकांबळे बंडू पाचलिंग इमरान लाला नजीर भाई बाळासाहेब फुलारी गिरीधर देशमुख नाझीम शेख दिगंबर खरवडे नासेर भाई सत्तार पटेल इरफान भाई स्मित देशमुख गोविंद झाडे एडवोकेट आतिफ काझी रामा देशमुख सिद्धार्थ भराडे यांच्या सह काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

मतपेट्या, मतदान साहित्यासह पथके केंद्रांकडे रवाना

आठही जिल्ह्यांत मतदान साहित्याचे वितरण पूर्ण

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी**०५ - औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांत आज मतदान साहित्याचे वितरण पूर्ण करण्यात आले. मतपेट्या व आवश्यक मतदान साहित्यासह नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांची पथके संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाली. उद्या शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत विभागातील ८४२ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून, त्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड व हिंगोली या आठही जिल्ह्यांत निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे. संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी हे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहत आहेत. त्यांच्या नियंत्रणाखाली आज तालुकानिहाय वितरण केंद्रांवरून मतदान पथकांना साहित्याचे वाटप करून नेमून दिलेल्या मतदान केंद्रांकडे रवाना करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील मतदान केंद्रांसाठी नियुक्त पथकांना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय येथून मतदान साहित्याचे वितरण करण्यात आले. जिल्ह्यातील अन्य तालुक्यांतही संबंधित मतदान केंद्रांसाठी नियुक्त पथकांना साहित्य देण्यात आले.

आठ जिल्ह्यांत ८४२ मतदान केंद्रे

मतदारसंघात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २१७, जालना ८९, परभणी ७६, हिंगोली ३६, नांदेड १२०, लातूर ८८, धाराशिव ७६ व बीड जिल्ह्यात १४० अशी एकूण ८४२ मतदान केंद्रे आहेत. या निवडणुकीसाठी ४१ उमेदवार रिंगणात असून, एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

सप्तशृंग गडावर खासगी वाहनांना प्रवेशबंदी

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त प्रशासनाचा निर्णय

नाशिक: नाशिकमधील सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील काना कोपऱ्यातून लाखो भाविक येत असतात. अलीकडेच नवरात्रोत्सव पार पडला. नवरात्रोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणावर भाविक देवीच्या दर्शनासाठी जात असतात. येत्या रविवारी कोजागिरी पौर्णिमा आहे. या दिवशी सुद्धा मंदिरामध्ये देवीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणावर येत असतात. अशातच कोजागिरी पौर्णिमेनिमित्त देवीच्या गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची अलोट गर्दी लक्षात घेता, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने वाहन प्रवेशबंदीच्या कालावधीत बदल केला आहे.

त्याप्रमाणे, नांदुरी ते सप्तश्रृंगी गड या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस सोडून इतर वाहने, ऑटोरिक्षा शिवाय सर्व प्रकारच्या खासगी चारचाकी आणि दुचाकी वाहनांना शुक्रवार, 23 ऑक्टोबर 2026 पासून सकाळी 6 वाजेपासून सोमवारी 26 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 6 वाजेपर्यंत प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे. याबद्दलची माहिती नाशिक जिल्ह्याचे अपर जिल्हादंडाधिकारी रोहित कुमार राजपूत यांनी दिली आहे.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सप्तश्रृंगी गडावर दर्शनासाठी राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतून भाविक येत असतात. 23 ऑक्टोबरपासून भाविकांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. हीच शक्यता लक्षात घेऊन स्थानिक प्रशासनाने आधीपासूनच नियम लागू करायचे ठरवले आहे. सप्तश्रृंग गडाचा घाट रस्ता अरुंद आणि वळणावळणाचा असल्यामुळे वाहतुक कोंडी होऊ नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, या दृष्टीने प्रवेशबंदीच्या कालावधीत सुधारणा करण्याची विनंती स्थानिक परिस्थितीचा विचार करून करण्यात आली होती.

मुराचा दणका: मुख्यध्यापकाचे निलंबन थांबवले

छत्रपती संभाजीनगर : आज दि 21 सुशीला देवी देशमुख विद्यालय छत्रपती संभाजी नगर या शाळेचे मुख्याध्यापक श्री. पहिलवान सर यांना हेतूपूरस्कर आणि जाणीवपूर्वक मुख्याध्यापक पदावरून ज़ि. परिषद छत्रपती संभाजी नगर च्या शिक्षणाधिकारी यांनी काढून टाकले होते. ही बाब मुष्टा संघटनेला समजल्या नंतर संघटनेचे नेते *राजेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात, सर्व कार्यकर्ते ज़िल्हा परिषदच्या शिक्षणाधिकारी यांना तातडीने भेटून संबधित मुख्याध्यापक यांचे झालेले निलंबन माघे घेन्यास भाग पाडले. या प्रसंगी प्रा. गजानन मकासरे, शेख मुनीर, सुनील पांडे, राजू देशमुख, राहूल चाट से,आमोल सरदार,नंदकुमार गवंडर, सुहास बोर्ड, संजय जाधव, प्रा. सना कादरी, संतोष जाधव आदी मुपटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सिडकोच्या बजरंग चौकात भरदिवसा निर्घृण खून

कारने धडक दिल्यानंतर लाकडी दांड्याने हल्ला; आरोपी स्वत: पोलीस ठाण्यात हजर



छत्रपती प्रतिनिधी : शहरातील सिडको परिसरातील बजरंग चौकात व्यावसायिक वैमनस्यातून एका तरुणाची भरदिवसा निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बंटी दीक्षित असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, हल्ल्यानंतर आरोपी स्वतः कारसह सिडको पोलीस ठाण्यात हजर झाल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बंटी दीक्षित आणि आरोपी यांच्यात व्यावसायिक स्पर्धा किंवा आर्थिक कारणांवरून वाद असल्याचे सांगण्यात येत आहे. याच वैमनस्यातून आरोपीने बजरंग चौक परिसरात बंटीला गाठले. त्यानंतर भरधाव कारने त्याला जोरदार धडक दिली. या धडकेत बंटी रस्त्यावर कोसळून गंभीर जखमी झाला.

कारने धडक दिल्यानंतर आरोपीने पुन्हा कार बाजूला उभी करून त्यानंतर कारमधून उतरून लाकडी दांड्याने त्याच्या डोक्यावर व चेहऱ्यावर वार केले. या हल्ल्यात गंभीर दुखापत झाल्याने बंटी दीक्षित याचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेनंतर आरोपी स्वतः ठाण्यात हजर

घटनेनंतर आरोपी स्वतः कारसह सिडको पोलीस ठाण्यात हजर झाला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हत्येमागील नेमके कारण, आर्थिक व्यवहारांचा संबंध आणि घटनेचा संपूर्ण घटनाक्रम तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

पोलीस ठाण्याजवळील घटनेने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

सिडको पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर, मंगेश गॅस एजन्सीसमोरील बजरंग चौक ते बळीराम पाटील मार्गावर ही घटना घडल्याने कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. वर्दळीच्या परिसरात भरदिवसा घडलेल्या या गंभीर गुन्ह्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. परिसरात पोलिसांची गस्त आणि अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी मतदान साहित्य पथक वाहनांना दाखवली हिरवी झेंडी

पात्र पदवीधर मतदारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा- जिल्हाधिकारी

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी: ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. परभणी जिल्ह्यातील एकूण ७६ मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून, त्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

परभणी जिल्ह्यातील सर्व पात्र पदवीधर मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे आणि उत्स्फूर्तपणे आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना आज वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या कृषी अवजारे निर्मिती, चाचणी व प्रशिक्षण केंद्र येथे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या उपस्थितीत मतदान साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक मनुष्यबळ, साहित्य व इतर व्यवस्थांची पूर्तता करून मतदान पथकांना संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते मतदान केंद्र क्रमांक २७३, आडगाव बाजार, तालुका जिंतूर येथील मतदान पथकाला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

याप्रसंगी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार परभणी संदीप राजापुरे, तहसीलदार गंगाखेड उषा किरण शृंगारे, तहसीलदार जिंतूर शीतल कचवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रांवर एकूण २६ हजार ६६४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये २१ हजार १८६ पुरुष व ५ हजार ४७८ महिला मतदारांचा समावेश आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर एक मतदान केंद्राध्यक्ष व तीन मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मतदान प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी २६ क्षेत्रीय अधिकारी, मतदान केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरिता ७६ रूट गाईड कर्मचारी आणि प्रत्येक मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततापूर्ण व नियमानुसार पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून, नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

भारत-अमेरिका ऊर्जा सहकार्य आणि जामनगरचा जागतिक दबदबा

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रूबियो आणि भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी गुजरातमधील जामनगर येथील रिलायन्स इंडस्ट्रीजच्या विशाल रिफायनरी प्रकल्पाला दिलेली भेट ही केवळ एका खाजगी उद्योगसमूहाचा दौरा नसून, भारत-अमेरिका आर्थिक व ऊर्जा मुत्सद्देगिरीच्या (Energy Diplomacy) दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. जगातील सर्वात मोठ्या सिंगल-लोकेशन रिफायनरी संकुलाची पाहणी करत असताना तंत्रज्ञानाची प्रगती, नव्या ऊर्जेची गिगाफॅक्टरी आणि निर्माणाधीन डेटा सेंटरची झालेली चाचपणी ही दोन्ही देशांमधील व्यावसायिक सहकार्याला नवी दिशा देणारी ठरत आहे. रिलायन्सचे चेअरमन मुकेश अंबानी आणि कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी जामनगरला जागतिक स्तरावरील नाविन्य (Innovation) आणि प्रगत उत्पादनाचे केंद्र बनवण्याची मांडलेली दूरदृष्टी जागतिक स्तरावर भारताची मजबूत ताकद अधोरेखित करते. भारत आणि अमेरिका यांच्यात द्विपक्षीय व्यापार कराराबाबत (Trade Deal) चर्चा सुरू असताना आणि रशियन कच्च्या तेलाच्या आयातीसह जागतिक पुरवठा साखळीच्या (Global Supply Chain) पुनर्रचनेचे वारे वाहत असताना ही भेट घडून आली आहे. भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणणे जितके गरजेचे आहे, तितकेच अमेरिकेसाठी आशियाई बाजारात विश्वासू ऊर्जा भागीदार शोधणे आवश्यक आहे. पारंपरिक तेल शुद्धीकरणाच्या पुढे जाऊन हरित ऊर्जा (Clean Energy), सौर ऊर्जा, हायड्रोजन तंत्रज्ञान आणि प्रगत अभियांत्रिकी क्षेत्रांत अमेरिकन कंपन्यांसोबत संयुक्त गुंतवणुकीची दारे या भेटीमुळे उघडली जाण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे. आजच्या डिजिटल युगात अत्याधुनिक डेटा सेंटर्स चालवण्यासाठी अखंड आणि किफायतशीर वीजपुरवठ्याची मोठी गरज असते. ऊर्जा आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा हा संगमच भविष्यातील जागतिक अर्थव्यवस्थेचा पाया ठरणार आहे. तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील अमेरिकन कंपन्यांची ताकद आणि रिलायन्सची अथांग उत्पादन क्षमता एकत्र आल्यास ती दोन्ही देशांच्या दृष्टीने परस्परांना पूरक ठरेल. जामनगरच्या या ऐतिहासिक भेटीमुळे केवळ इंधनाचा पुरवठाच नव्हे, तर डिजिटल अर्थव्यवस्था, नवतंत्रज्ञान आणि हरित ऊर्जेच्या क्षेत्रांत भारत-अमेरिका व्यापार संबंध एका नव्या आणि भक्कम उंचीवर पोहोचतील, यात शंका नाही.

प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीच्या अशासकीय सदस्यांची नियुक्ती; इच्छुकांकडून अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर,दि.२२(जिमाका)-राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीची स्थापना करावयाची आहे. त्यात अशासकीय सदस्यांची नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत,असे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा परिषद डॉ. एन.एस. कदम यांनी कळविले आहे.

या समितीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी असतात. या समितीत अशासकीय सदस्य नियुक्त करावयाचे आहेत. त्यात जिल्ह्यातील गोशाळा/पांजरपोळ संस्थेचा अध्यक्ष, प्राणी कल्याण विषयक कार्य करणाऱ्या संस्थेचे दोन सदस्य, सर्वसाधारण समितीने नामनिर्देशीत केलेल्या दोन व्यक्ती, मानवहितकारक तसेच प्राणी कल्याण क्षेत्रात कार्य करणारे व्यक्ती असे सदस्य नेमण्यात येणार आहेत. या सदस्यांना कार्यकाळ तीन वर्षांचा राहील. इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात सादर करावे. अर्जाचा नमुना त्याच कार्यालयात उपलब्ध आहे.

'आपले सरकार सेवा केंद्रा'साठी 3 हजार 677 अर्ज प्राप्त, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर यादी उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (जिमाका)- जिल्ह्यात आपले सरकार सेवा केंद्रांसाठी ग्रामीण व शहरी भागांतून एकूण ३ हजार ६७७ अर्ज प्राप्त झाले आहेत. या अर्जांची तालुकानिहाय यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत **https:**//chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधितांनी संकेतस्थळावर यादी पाहावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे. जिल्ह्यातील शहरी व ग्रामिण भागातील मिळून रिक्त असलेल्या ८५० आपले सरकार सेवा केंद्र साठी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात आले होते. सर्व मिळून एकूण ३ हजार ६७७ अर्ज जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत. त्याची वर्गवारी याप्रमाणे- ग्रामीण भागातील ६६५ रिक्त जागांसाठी एकूण २ हजार ५५६ अर्ज प्राप्त झाले. यामध्ये २ हजार ५२७ सर्वसाधारण अर्ज आणि २९ 'लागू नाही' या वर्गवारीतील अर्जांचा समावेश आहे. शहरी भागातील सेवा केंद्रांसाठी १८५ रिक्त जागांच्या तुलनेत १ हजार १२१ अर्ज प्राप्त झाले आहेत. हे सर्व अर्ज सर्वसाधारण वर्गवारीतील आहेत. ग्रामीण भागात सिल्लोड तालुक्यात सर्वाधिक ४५५ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याखालोखाल कन्नड तालुक्यात ३६६, छत्रपती संभाजीनगर तालुक्यात ३६२ आणि पैठण तालुक्यात ३५० अर्ज प्राप्त झाले आहेत. आपले सरकार सेवा केंद्रांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची तालुकानिहाय यादी जिल्ह्याच्या **https:**//chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, संबंधितांनी यादीची पाहणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

युवकाचा खून करुन प्रेत पाट्याच्या पाण्यात फेकले, पोलिसांनी दोघा आरोपीना पकडले

अहिल्यानगर : प्रेम संबंधातुन झालेल्या खुनाचा उलगडा, जिवे ठार मारुन कॅनॉलमध्ये फेकुन दिलेले प्रेत शोधण्यात एमआयडीसी पोलीसांना यश आले असून या गुन्ह्यात दोन आरोपी जेरबंद करण्यात आले.ही कारवाई एमआयडीसी पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्तपणे केली आहे. फिर्यादी प्रदीप मच्छिद्र गायकवाड, वय ३४ वर्ष, रा. कमलपुर, ता. श्रीरामपुर यांनी फिर्याद दिली की, दि. १७/१०/२०२६ रोजी रात्री ८.३० वा. चे सुमारास (शिंगवेनाईक, ता. जि. अहिल्यानगर) येथे माझा भाऊ गणेश मच्छिद्र गायकवाड, (वय ३२ वर्ष, रा. कमलपूर, ता. श्रीरामपुर) यास शिंगवेनाईक गावातील महेश जाधव व योगेश जाधव यांनी मारहाण करुन त्यास जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचे प्रेत राहुरी कृषी विद्यापीठ जवळील मुळा डॅमचे बैंक वॉटर कॅनॉलमध्ये फेकुन दिले आहे. वगैरे फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे बीएनएस कलम १०३(१), २३८, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता . सदर गुन्ह्याचा तपास सुरु असताना आरोपी महेश राजेंद्र जाधव हा जळगाव, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे लपुन बसल्याची गोपनीय माहिती सपोनि हेमंत थोरात यांना मिळताच तात्काळ तपासपथकाने जावुन आरोपी महेश जाधव यास ताब्यात घेतले. तसेच गुन्ह्यातील आरोपी योगेश राजेंद्र जाधव हा मुळा डैम, राहुरी, जि. अहिल्यानगर येथे लपुन बसलेला असले बाबत स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि हरीश भोये यांना गोपनीय माहिती मिळाल्याने त्यांनी शिताफीने त्यास ताब्यात घेतले.

जगाची वाटचाल तिसऱ्या महायुध्दाकडे;तरीही "संयुक्त राष्ट्रसंघ"बघ्याच्या भूमिकेत?

जगातील काही भागात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे व याचा गंभीर परिणाम जगातील तळागाळातील देशांवर होत आहे.याबाबी संयुक्त राष्ट्र उघड्या डोळ्यांनी पहात आहे. परंतु यावर तोडगा किंवा कोणतीही कठोर निर्णय घेतांना दिसत नाही ही जगासाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. २०२० मधील अजरबैझान-आर्मेनिया युद्ध ,२०२१ चे अफगाणिस्तान-तालिबान युद्ध,२०२२ पासुन आतापर्यंत सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता नुकताच सुरू झालेले हमास-हिज्बुल्ला-इराण-इस्त्रायल-अमेरिकेचा भयावह संघर्ष यामुळे जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. अशा भयावह स्थितीमध्ये परमाणू युध्दाची शक्यता नाकारता येत नाही. कारण हे युद्ध आता हमास-हिज्बुला -इराण-अमेरिका-इस्त्रायल युद्ध किंवा रशिया-युक्रेन युद्ध सीमित रहाले नसुन महायुद्धाची नांदी आहे.अशा परिस्थितीत तिसऱ्या महायुध्दाची ठीनगी केव्हाही उडु शकते व आगीचा गोळा बनु शकते याला नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे चीन-तैवान संघर्ष सुरूच आहे आणि आता अफगाणिस्तान व पाकिस्तान यांचाही संघर्ष टोकाला पोहोचला आहे.अशा भयावह स्थितीत तिसऱ्या महायुद्धाची पुणरावृत्ती होणार नाही याची दक्षता "संयुक्त राष्ट्रसंघाने"घेतली पाहिजे. परंतु सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका संथगतीने दिसत आहे. यामुळे जगात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत गेल्या चार वर्षांपासून रशिया -युक्रेन युद्ध किंवा आता सुरू असलेला हमास-हिज्बुल्ला- इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्ष किंवा अफगाणिस्तान- पाकिस्तान संघर्ष जगाला केव्हाही हादरा देवू शकतो .सध्या निर्माण झालेली जगातील "विध्वंसकारी" परीस्थिती पहाता "संयुक्त राष्ट्रसंघाने" मानव कल्याणासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.परंतु संयुक्त राष्ट्रसंघाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे.आज संयुक्त राष्ट्रसंघ ८१ वर्षांचा झाला असला तरीही जगात संघर्ष कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना अनेक देशांतील घडामोडीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असते.पहिल्या महायुद्धानंतर १९२९ मध्ये "राष्ट्र संघाची" स्थापना करण्यात आली.परंतु "राष्ट्रसंघ" प्रभावहीन असल्यामुळे "संयुक्त राष्ट्रसंघटनेची"२४ आक्टोंबर १९४५ ला स्थापना करण्यात आली.यावेळी संयुक्त राष्ट्र अधिपत्रावर ५० देशांच्या सह्यानीशी याची स्थापना करण्यात आली.परंतु आता जगातील अनेक देश संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य आहेत. यामुळे प्रत्येक देशाला आप-आपल्या तक्रारी मांडन्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघटनेने दिलेला आहे.युध्द जन्य परीस्थिती,भुकमरी, कुपोषण,मानवधिकार,अंतराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि विश्व शांति इत्यादी संपूर्ण बाबींनवर चर्चा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून केली जाते.दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी झालेल्या देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्राला आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेचा उद्देश हा आहे की भविष्यात द्वितीय महायुध्दासारखी महाभयानक परीस्थिती उदभवु नये या उद्देशाने याची स्थापना करण्यात आलेली आहे.संयुक्त राष्ट्र संघटनेची संरचना शक्तीशाली देश अमेरिका,फ्रांस,ब्रिटन,रूस आणि संयुक्त राजशाही यांनी द्वितीय विश्व युध्दात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली होती. सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये १९३ पेक्षा जास्त देश आहेत.जगातील सर्वच आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त देश या संस्थेशी जुडुन आहेत.या संस्थेची संरचना,आम सभा,सुरक्षा परिषद,आर्थिक व सामाजिक परिषद, सचिवालय आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय या संपूर्ण बाबीं या संस्थेमध्ये आहेत.संयुक्त राष्ट्र संघटना ही एक चांगली आंतरराष्ट्रीय उपयोगी संघटना आहे. गेल्या २० वर्षापासुन अफगाणिस्तानमध्ये अमेरिका व नाटोची सेना होती.यामुळे अफगाणिस्तानचे नागरिक स्वतःला सुरक्षित समजत होते. परंतु अमेरिकेने २०२१ मध्ये आपले सैन्य माघारी बोलावल्यामुळे अवघ्या १०० दिवसात खुनी तांडव निर्माण होवून लाखो निरअपराध्यांचा बळी तालिबानी आतंकवाद्यांनी घेतला व अफगाणिस्तानवर संपूर्ण कब्जा मिळविला आणि अफगाणिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले.परंतु यात संयुक्त राष्ट्र संघाने थोडासाही हस्तक्षेप केला नाही ही संयुक्त राष्ट्रसंघाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.संयुक्तराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून पाकिस्तान नेहमी भारताच्या विरूद्ध चिखल फेक करीत असतांना दीसुन येते.सिरियामधील अत्याचाराच्या घटना संयुक्त राष्ट्रसंघापुढे मांडुन या घटना जम्मु काश्मिरमध्ये घडत असल्याचे सांगून भारत मानवाधिकाराचे उल्लंघन करीत असल्याचा "पोपोगंडा"पाकिस्तान नेहमीच करीत असतो. कारण भारतीय घटनेतील ३७० व ३५ ए कलम हटविल्याचे दःख पाकिस्तानला जास्तच होत असल्याचे दिसून येते.त्यामुळे हा मुद्दासुध्दा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांमध्ये अनेकदा नेलेला आहे.परंतु संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानचे संपूर्ण आरोप फेटाळून लावले.आज संयुक्त राष्ट्र संघ नसता तर जगामध्ये अनेक देशात आपसा-आपसात गृहयुद्ध पहायला मिळाली असती. कारण आज जगातील संपूर्ण राष्ट्रे "बारूदच्या ढीगाऱ्यावर"बसली आहेत व एकमेकांना धमकी देताना दिसतात.परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून अनेक राष्ट्रांमध्ये होत असलेला संघर्ष व कटुता दुर करण्याचे काम आज संयुक्त राष्ट्र संघटना करीत आहे.आज उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात नेहमी तनातनीचे वावरत दिसायचे परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून यावर तोडगा काढण्यात आला व युध्दजन्य परीस्थिती हाताळण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघटनेने केले.उत्तर कोरियाचा "तानाशहा किंम जोंग उन" हा नेहमी अमेरिकेला युध्दाची धमकी देत असतो आणि आताही देतो. परंतु संयुक्त राष्ट्रसंघटना याला हाताळण्याचे काम करीत असते.२०२० मध्ये अजरबैझान -आर्मेनिया यांच्यातील संघर्ष टोकाला गेला होता. यांच्या संघर्षामुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल जगावर दिसत होते. कारण अजरबैझान-आर्मेनिया यांचा संघर्ष गेल्या १०० वर्षांपासून सुरू आहे.हा संघर्ष थांबावा याकरिता अमेरिका व रशिया कसोटीचे प्रयत्न करीत होते परंतु युद्ध थांबे ना!यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने अजरबैझान-आर्मेनिया यांच्यातील संघर्ष थांबवीण्या करीता युध्दपातळीवर प्रयत्न करून युद्ध थांबवीले. अन्यथा मुस्लिम राष्ट्र विरूद्ध ईसाइ राष्ट्र अशी युद्धाची स्थिती उद्भवण्याची शक्यता होती.अशी कठीण परिस्थिती निवळण्याकरीता "संयुक्त राष्ट्र संघाने"टोकाची भूमिका घेने गरजेचे असते. चीनची विस्तारवादी नीती रोखण्याकरीता व पाकिस्तानच्या आतंकवादी कारवाया रोखण्याकरीता पश्चिम आशियात नवे "क्वाड" स्थापन करण्यात आले आहे यात भारत,अमेरिका,ऑस्ट्रेलिया आणि जापान हे देश आहेत यामुळे आशिया खंडात शांतता प्रस्थापित करण्यास मोठी मदत होणार आहे.संयुक्त राष्ट्रसंघ जरी ८१ वर्षांचा झाला असला तरी त्यात नवीन उर्जा निर्माण करून जगातील संघर्षमय वातावरण यावर ताबडतोब अंकुश लावण्याची गरज आहे.कारण संयुक्त राष्ट्र संघाने अनेक महत्वपूर्ण कार्य केले आहे याचे उदाहरण जगापुढे आहे. पाकिस्तान आताही खुंखार आतंकवाद्यांना खत पाणी घालत आहे व भारत विरोधी कारवाईला अंजाम देण्याचे काम नेहमीच करीत असतो.परंतु भारत त्याला जशास तसे उत्तर देऊन त्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम करीत असतो.संयुक्त राष्ट्रसंघटनेला भारताने सीध्द करून दाखवले की भारत विश्वामध्ये शांती प्रस्थापित करू शकते. भारताचे प्रखर नेत्यृत्व व प्रखर विचाराने संपूर्ण संयुक्त राष्ट्रसंघनेतील १९३ देश प्रभावीत आहे.त्यामुळेच आज भारताची मान उंचावली आहे. भारत कोणाच्याही सुख दुःखात नेहमीच सहभागी होत असतो. कारण कठीण घडीला मदत करने ही बाब भारताच्या संस्कृतीमध्ये, सभ्यतेमध्ये व रक्ता-रक्तामध्ये आहे. हीबाब इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी,सुष्मा स्वराज,नरेंद्र मोदी यांनी सीध्द करून दाखविली.भारताने नेहमी मानवाच्या कल्याणासाठी व हीतासाठी आवाज बुलंद केला आहे यात पर्यावरणाचा मुद्दा, ग्लोबल वॉर्मींग व निसर्गाची ढासळती परीस्थिती या संपूर्ण बाबींवर भारताने संयुक्त राष्ट्राचे लक्ष केंद्रित केले आहे.भारताने आणि संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानला नेहमी रक्ताच्या थारोळ्यातुन बाहेर काढण्याचे प्रयत्न सुध्दा केले आहे. परंतु पाकिस्तानच्या वागनुकीवरून असे दीसुन येते की "कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच" यामुळे पाकिस्तानने आतातरी सुधरूण जावे अन्यथा पाकिस्तानचा विनाश अटळ आहे.आज जगात कोणत्याही देशांशी वैरत्व करने म्हणजे तिसऱ्या महायुद्धाकडे वळने होय.देशा-देशामध्ये कटुता निर्माण होवु नये किंवा कटुता निर्माण झाली तर ती निवळण्याकरीता आज "संयुक्त राष्ट्र संघटना" रोखठोक भुमिका बजावण्याचे काम करीत आहे. अन्यथा महायुद्ध केंव्हाही उद्भवले असते. परंतु यावर ब्रेक आणि लगाम लावण्याचे काम "संयुक्त राष्ट्र संघटना" करीत आहे. म्हणजेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून जनकल्यानाचे काम मोठ्या प्रमाणात होतांना दीसते.गेल्या ७९ वर्षांपासून भारता विरुद्ध पाकिस्तानच्या कुरापती सुरूच होत्या आणि आहे.परंतु भारताने पाकिस्तानची पोल खोलल्याने "संयुक्त राष्ट्र संघाने"पाकिस्तानला आता पंगु केल्याचे दिसून येते.त्यामुळे संयुक्त राष्ट्राने आनखी कडक प्रतीबंध लावुन पाकिस्तानला त्याची जागा दाखविली पाहिजे.आज संयुक्त राष्ट्रसंघाच्या नजरेत भारत विश्वशांतीचा दुत असल्याचे संबोधले जाते. आज जगातील देशांकरीता काही निर्णय घ्यायचा असला तर सर्वप्रथम "संयुक्त राष्ट्र संघ" भारताशी संवाद करून निर्णय घेत असतो. "संयुक्त राष्ट्र संघटना"ही जगाला "जिवनदान" देणारी संस्था असल्याचे मी समजतो. परंतू सध्याच्या इजरायल-हमास-इराण-हिज्बुल्ला-अमेरिका व रशिया -युक्रेन युद्ध याबाबत कठोर पाऊल न उचलता संयुक्त राष्ट्र संघ बघ्याची भूमिका घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.२१ व्या शतकात मानवी युध्दापेक्षा आता "द्रोणने"युध्द सुरू झाल्याचे दिसून येते.द्रोणचे युध्द जगाला घातक सीध्द होवु शकते व होत आहे आणि जगाला विनाशाकडे नेत नाही. कारण अत्याधुनिक युगात संपूर्ण देश सध्याच्या परीस्थितीत अत्याधुनिक शस्त्र सामग्री, अनुबॉम्ब, मीसाईल, बॅलेस्टीक, क्लस्टरबॉम्ब, अणुबॉम्ब,अत्याधुनिक द्रोण,अशाप्रकारचे विनाशकारी आणि घातक शस्त्र सामग्री जगातील संपूर्ण देशांनी अवगत केली आहे.आज संपूर्ण देश अत्याधुनिक द्रोण खरेदीच्या शर्यतीत आहे व प्रत्येक देश यात सामोरं जाण्याच्या शर्यतीत आहे.यावर "संयुक्त राष्ट्रसंघाने" लक्ष ठेवण्याची गरज आहे. अन्यथा पृथ्वीचा विनाश दुर नाही.१९४५ ला संयुक्त राष्ट्रांची परीस्थिती वेगळी होती.परंतु गेल्या ५ वर्षात संपूर्ण जगात अत्यंत संघर्षमय, युद्धजन्य व भयावह वातावरण निर्माण झाले आहे.याकरीता संयुक्त राष्ट्र संघाला आणखी कडक नियमावली तयार करून जगातील "खुनी संघर्ष" थांबवीलाच पाहिजे. १९४५ च्या नंतरची आव्हाने आवश्यकतेनुसार वेगळी होती.परंतु आज संपूर्ण जगापुढे वेगळे आव्हान आहे.पण ज्या हेतूने संयुक्त राष्ट्रांची स्थापणा झाली तो हेतू आजही आहे का ?असा प्रश्न जगापुढे उपस्थित आहे.जगात पुर्वीही गृह युद्ध व्हायची आणि आजही अनेक देशांमध्ये गृहयुद्ध सुरू आहे.परंतु आजचे गृह युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने वाटचाल करतांना दिसत आहे. आज संपूर्ण जगावर संयुक्त राष्ट्र संघाचे नियंत्रण असने गरजेचे आहे. संयुक्तराष्ट्र संघाची स्थापना यासाठीही करण्यात आली की दुसऱ्या महायुद्धासारखी परीस्थिती पुन्हा उदभवु नये.परंतु दुःखाची बाब म्हणजे आज संपूर्ण जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेआहे. जगातील बदलता काळ पहाता व युध्दाची गंभीर परिस्थिती पहाता संयुक्त राष्ट्र संघाने कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे. यावरून स्पष्ट होते की संपूर्ण जग युध्दाच्या खाईत लोटल्या जात आहे. त्यामुळे २४ आक्टोंबर संयुक्त राष्ट्र दिवस"लक्षात घेता कठोर पाऊल उचलुन जगातील युद्धजन्यपरीस्थिती रोखली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत जगात दुसऱ्या महायुद्धापेक्षाही भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. रशिया-युक्रेन व हमास- हिज्बुल्ला-इराण-इस्त्रायल-अमेरिका युध्दामुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल संपूर्ण जगभर दीसत आहे.ज्या उद्देशासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली व सध्याच्या परिस्थितीत ज्या पद्धतीची युद्धजन्य परिस्थिती काही राष्ट्रांमध्ये निर्माण झाली आहे त्याबाबतीत ती हाताळण्यात संयुक्त राष्ट्रसंघ प्रभावहिन दिसत आहे.त्यामुळे सध्याची कठीण परिस्थिती पहाता "संयुक्त राष्ट्र संघाने" शांतता प्रस्थापित करण्यासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.अन्यथा पृथ्वीचा व संपूर्ण जीवसृष्टीचा विनाश अटळ आहे.जय हिंद.

रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

ज्या दिवशी आम्ही समानतेची भीक मागणे सोडले आणि स्वाभिमानाचा इतिहास घडवला!

१४ ऑक्टोबर १९५६! भारतीय इतिहासातील हा केवळ एक दिवस नव्हता, तर तो हजारो वर्षांच्या जातीय विषमतेला दिलेला वैचारिक हादरा होता. तो केवळ धर्मांतराचा सोहळा नव्हता; तो माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध पुकारलेला स्वाभिमानाचा एल्गार होता. नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि भारतीय समाजाच्या इतिहासात परिवर्तनाचे नवे पर्व सुरू झाले. ज्या समाजाला शतकानुशतके समानतेसाठी याचना करायला शिकवले गेले, त्या समाजाला बाबासाहेबांनी स्वतःच्या प्रतिष्ठेने जगण्याचा मार्ग दाखवला. हा त्यांच्या धम्मदीक्षेचा सर्वांत मोठा अर्थ आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनाला केवळ हार, फुले, मिरवणुका आणि जयघोष यांपुरते मर्यादित ठेवणे म्हणजे या ऐतिहासिक क्रांतीची धार बोथट करणे होय. हा दिवस आहे आत्मपरीक्षणाचा, वैचारिक जागृतीचा आणि सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी स्वीकारण्याचा!

ज्या समाजाला सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यापासून, शाळेत सन्मानाने बसण्यापासून आणि मंदिरात प्रवेश करण्यापासून रोखले जात होते, त्या समाजाला बाबासाहेबांनी एक मूलभूत प्रश्न विचारायला शिकवला. जिथे माणूस म्हणून माझा सन्मानच नाही, तिथे माझ्या अस्तित्वाची मान्यता मागत किती काळ उभे राहायचे? हा प्रश्न केवळ मंदिरप्रवेशाचा नव्हता; तो मानवी प्रतिष्ठेचा होता. तो धार्मिक रूढींचा नव्हता; तर सामाजिक न्यायाचा होता. तो एका समाजाच्या वेदनेचा नव्हता; तर संपूर्ण मानवतेच्या विवेकाचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराचा निर्णय घेतला, तो कोणाच्या द्वेषातून नव्हे, तर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारलेला समाज घडवण्याच्या ध्येयातून. त्यांनी वंचित समाजाला केवळ अन्यायाविरुद्ध आवाज दिला नाही, तर अन्यायाला जन्म देणाऱ्या विचारसरणीचे चिकित्सक परीक्षण करण्याची दृष्टी दिली. धर्मांतर म्हणजे केवळ नाव बदलणे नव्हे. धर्मांतर म्हणजे स्वतःकडे पाहण्याची दृष्टी बदलणे, अन्यायाला नकार देणे आणि विवेकाच्या आधारावर नव्या जीवनाची सुरुवात करणे.

आजही प्रश्न विचारला जातो, २२ प्रतिज्ञा वारंवार का म्हणायच्या? त्यांना एवढे महत्त्व का द्यायचे? कारण गुलामगिरीच्या साखळ्या केवळ शरीरावर नसतात; त्या विचारांवरही असतात. एखादी व्यवस्था माणसाला वर्षानुवर्षे कनिष्ठ असल्याची जाणीव करून देत असेल, तर त्या व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष केवळ कायद्याने पूर्ण होत नाही. त्यासाठी मनातील न्यूनगंड, अंधश्रद्धा आणि जन्माधिष्ठित श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना यांनाही आव्हान द्यावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा या वैचारिक परिवर्तनाचा महत्त्वाचा आधार आहेत. विशिष्ट धार्मिक कर्मकांडांचा त्याग, अंधश्रद्धेला नकार, समानतेचा स्वीकार, नैतिक आचरण आणि बौद्ध धम्माच्या मार्गाने जीवन जगण्याचा संकल्प, या प्रतिज्ञांचा आशय व्यापक सामाजिक परिवर्तनाशी जोडलेला आहे. पण येथेच आत्मपरीक्षणाचा खरा प्रश्न उभा राहतो. आपण प्रतिज्ञा उच्चारतो; परंतु त्या आचरणात आणतो का? आपण बुद्ध वंदना करतो; पण घरात स्त्री-पुरुष समानता पाळतो का? आपण समतेची घोषणा करतो; पण स्वतःच्या व्यवहारात जातीय भेदभावाला विरोध करतो का? आपण बाबासाहेबांचे छायाचित्र लावतो; पण त्यांच्या विचारांचे वाचन करतो का? बाबासाहेबांच्या प्रतिमेला हार घालणे सोपे आहे, त्यांच्या विचारांनुसार स्वतःचे आचरण बदलणे कठीण आहे आणि नेमकी हीच धम्मनिष्ठेची खरी परीक्षा आहे!

१९३५ मध्ये येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीर केले, "मी हिंदू म्हणून जन्मलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही." हे विधान क्षणिक भावनेचे नव्हते. त्यामागे जातिव्यवस्थेचा दीर्घ अभ्यास, सामाजिक संघर्षाचा अनुभव आणि मानवी प्रतिष्ठेबद्दलची खोल बांधिलकी होती. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. धर्म आणि समाज यांच्यातील संबंध तपासले. माणसाला समानतेने जगण्याची संधी कोणता विचार देऊ शकतो, याचा शोध घेतला. अखेरीस त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. बुद्धांचा धम्म प्रज्ञा, शील आणि करुणेवर भर देतो. तो माणसाला प्रश्न विचारण्याची, विवेकाने निर्णय घेण्याची आणि नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची प्रेरणा देतो. बाबासाहेबांनी या धम्माला आधुनिक भारतातील सामाजिक न्यायाच्या चळवळीशी जोडले. त्यांना केवळ कायद्याने समानतेचा अधिकार मिळवून द्यायचा नव्हता; तर समाजाच्या मनात समानतेची जाणीव निर्माण करायची होती. कारण संविधानाने अस्पृश्यता नाकारली, तरी मनातील जातीय पूर्वग्रह एका दिवसात नष्ट होत नाहीत. कायद्याला सामाजिक जाणीवेची साथ मिळाली, तरच परिवर्तन अधिक परिणामकारक ठरते.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी नागपूर येथे झालेली धम्मदीक्षा ही आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना ठरली. या दिवसाने लाखो लोकांना नवी ओळख, स्वाभिमान आणि वैचारिक दिशा दिली. आपल्यासाठी विजयाचा अर्थ केवळ एखाद्या व्यक्तीचा किंवा समूहाचा पराभव नसावा. अज्ञानावर ज्ञानाचा, अंधश्रद्धेवर विवेकाचा, विषमतेवर समानतेचा आणि अपमानावर मानवी प्रतिष्ठेचा विजय ही या दिवसाची व्यापक प्रेरणा आहे. सारनाथ येथे बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तित केले. नागपूरच्या दीक्षाभूमीवर बाबासाहेबांनी त्याच धम्माला आधुनिक सामाजिक परिवर्तनाच्या ऐतिहासिक प्रवाहाशी जोडले. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ भूतकाळाचा गौरव करण्याचा दिवस नाही; तो वर्तमानातील विषमता ओळखून भविष्य बदलण्याचा संकल्

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

वर्षावासानिमित्त लोकुत्तरा संस्थेचा भोजनदानाचा उपक्रम!



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : लोकुत्तरा शैक्षणिक, सामाजिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने वर्षावासानिमित्त भोजनदानाचा उपक्रम राबविण्यात आला. मानवतेची सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमातून करुणा, मैत्री आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

भगवान गौतम बुद्ध यांनी जगाला दिलेला करुणा, दया आणि मानवतेचा संदेश आचरणात आणणे, हीच खरी सामाजिक सेवा आहे. याच विचारांना अनुसरून लोकुत्तरा शैक्षणिक, सामाजिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने चौका येथे भोजनदान करण्यात आले. वर्षावासाच्या पवित्र पर्वानिमित्त आयोजित या उपक्रमातून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव अधोरेखित करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष निखिल खंडागळे यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात सेवाभावी उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देणे, सामाजिक सलोखा वाढविणे आणि मानवतेची मूल्ये जपणे, हा अशा उपक्रमांमागील मुख्य हेतू आहे. सेवाभाव हाच खरा धर्म, तर भुकेलेल्याला अन्नदान हीच मानवतेची खरी शिकवण, या भावनेतून राबविण्यात आलेल्या भोजनदानाच्या उपक्रमातून सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला.



जिंतूर - दिवाळीच्या सना मुळे सोयाबीन बाजारात, सोयाबीनची आवक आल्याने बाजारात 6,400 ते 6,900 भाव. भाव कमी असल्याने शेतकरी चिंतेत. छाया - सचिन रायपत्रीवार

पाणीटंचाई टाळण्यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर करा : अयोध्या खिस्ते



जिंतूर,दि.22(प्रतिनिधी) : भविष्यात उद्भवणारे पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पाण्याचा वापर जपून आणि काटकसरीने करावा, असे आवाहन जिंतूर पंचायत समितीच्या सभापती अयोध्या किशोर खिस्ते यांनी केले.

पाणी हे मानवी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, त्याशिवाय जीवनाची कल्पनाही करता येत नाही. पाण्याचे महत्त्व लक्षात घेता प्रत्येकाने पाण्याचा अपव्यय टाळणे गरजेचे आहे. घरगुती वापर, शेती तसेच इतर कामांसाठी पाणी वापरताना योग्य नियोजन करावे. नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये, पाण्याची गळती तातडीने थांबवावी आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन गावोगावी जलसंधारणाची कामे करणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याचा जपून वापर करणे तसेच जलस्रोतांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. पाणीटंचाईचे संकट केवळ प्रशासनाच्या प्रयत्नांनी दूर होणार नसून, त्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा

विधान परिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीत असे करा मतदान, शुक्रवारी 23 ऑक्टोबरला मतदान !

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी येत्या शुक्रवारी २३ ऑक्टोबर रोजी मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची मतदान पद्धती आणि आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या अन्य सार्वत्रिक निवडणुकातील मतदानाची पद्धती यात मूलभूत फरक आहे. विधानपरिषद निवडणूकीचे मतदान हे मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावापुढे पसंतीक्रम नोंदवून घेण्यात येते. जितके उमेदवार निवडणूक लढवित असतील अशा सर्वांपुढे पसंतीक्रम नोंदविता येतो. मतदानाच्या या वेगळ्या पद्धतीमुळे मतदारांनी आणि विशेषतः प्रथमच मतदान करणाऱ्यांनी ही पद्धत जाणून योग्यरितीने मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी केले आहे.

असे करा मतदान

मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने मतपत्रिकेबरोबर पुरवलेले जांभळ्या (व्हायलेट) रंगाचे स्केच पेनच वापरावे. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल, बॉलपॉईन्ट पेन किंवा अन्य कोणतेही लेखनाचे साधन मतदानासाठी वापरु नये. असे केल्यास तुमची मतपत्रिका अवैध ठरेल. उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभामध्ये तुम्ही प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर १ असा आकडा लिहून मतदान करा. १ हा आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर द्यावा.

निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या विचारात न घेता जेवढे उमेदवार निवडणूक लढवत असतील तेवढे पसंतीक्रम तुम्हाला देता येतील. उर्वरीत उमेदवारांबाबतचा तुमचा पुढील पसंतीक्रम, अशा उमेदवारांच्या नावासमोर असलेल्या पसंतीक्रम या स्तंभामध्ये तुमच्या पसंतीक्रमानुसार २, ३, ४ इत्यादी आकडे टाकून दर्शवा.

कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर आपण फक्त एकच आकडा टाकलेला आहे याची खात्री करून घ्यावी. तसेच तोच आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर टाकलेला नाही याची देखील खात्री करुन घ्यावी. पसंतीक्रम फक्त १, २, ३ इत्यादी आकड्यांमध्येच दर्शवावा. एक, दोन, तीन इत्यादी शब्दांमध्ये दर्शवू नये. पसंतीक्रमाचे आकडे भारतीय अंकाच्या 1, 2, 3 इत्यादींसारख्या आंतरराष्ट्रीय रुपात किंवा I, II, III इत्यादींसारख्या रोमन रुपात किंवा १, २, ३ अशा देवनागरी रुपात किंवा संविधानाच्या आठव्या अनुसूचीमधील मान्यता दिलेल्या कोणत्याही एका भारतीय भाषेमध्ये वापरण्यात येणाऱ्या रुपामध्ये चिन्हांकित करता येतील.

मतपत्रिकेवर मतदाराने आपले नाव, आद्याक्षरे किंवा अन्य शब्द लिहू नयेत किंवा स्वाक्षरी करु नये. तसेच आपल्या अंगठ्याचा ठसा देखील उमटवू नये. असे केल्यास आपली मतपत्रिका अवैध ठरेल.

पसंतीक्रम दर्शविण्यासाठी तुमच्या निवडीच्या उमेदवाराच्या नावासमोर √ किंवा X अशी खूण करणे टाळावे. अशा मतपत्रिका बाद करण्यात येतील. पसंतीक्रम फक्त आकड्यांमध्येच दर्शवावा.

आपली मतपत्रिका वैध ठरण्यासाठी एकूण उमेदवारांपैकी एका उमेदवारासमोर १ हा आकडा लिहून तुमची पहिली पसंती दर्शवणे आवश्यक आहे. इतर पसंतीक्रम देणे ऐच्छिक आहेत. म्हणजेच इच्छेनुसार दुसरी किंवा पुढील पसंती दर्शवावी.

अशा मतपत्रिका अवैध ठरतील

१ हा आकडा टाकलेला नसल्यास. १ हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर टाकलेला असल्यास. १ हा आकडा, तो कोणत्या उमेदवाराला देण्यासाठी टाकलेला आहे याबाबत शंका निर्माण होईल अशाप्रकारे टाकलेला असेल. एकाच उमेदवाराच्या नावासमोर १ आणि त्याबरोबर २, ३ इत्यादी आकडे देखील टाकलेले असतील. पसंतीक्रम आकड्याऐवजी शब्दांमध्ये दर्शवलेला असेल. मतदाराची ओळख पटू शकेल अशी कोणतीही खूण किंवा लेखन असले, आणि असे आकडे टाकण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेन व्यतिरिक्त अन्य साधनाने कोणताही आकडा टाकलेला असेल, तरी अशी मतपत्रिका अवैध ठरेल.

बुलडाणा अर्बन सिल्लोड शाखेच्या वतीने मयत सभासदाच्या वारसदारास धनादेशाचे वितरण



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२२ ऑक्टोबर

सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन समाजातील विविध उपेक्षित घटकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या शाखा सिल्लोड च्या वतीने मयत कर्जदार सभासदाच्या वारसदारास विमा धनादेश वितरण करण्यात आले.संस्थेच्या शाखा सिल्लोड येथील सभासद बहादुर सिंग धवलसिंग कायटे यांनी दिनांक 01/06/2026 रोजी सोने तारण कर्ज घेतले होते परंतु दिनांक 07/06/2026 रोजी त्यांचा विजेचा शॉक लागल्याने अपघाती मृत्यू झाला. बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने संस्थेचे ठेवीदार, कर्जदार सभासदांना अपघाती विम्याचे संरक्षण देण्यात येते. त्यासंदर्भात बहादुर सिंग कायटे यांच्या कुटुंबीयास अपघाती विमा योजनेचा लाभ मिळावा यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी व संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कोमलताई झंवर,संस्थेचे सरव्यवस्थापक कैलासजी कासट व सिल्लोड विभागाचे विभागीय व्यवस्थापक संजय आनंदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे यांनी कायटे कुटुंबीयांची भेट घेऊन संस्थेच्या अपघाती विमा योजनेची माहिती दिली. आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून विमा प्रस्ताव मुख्यालयाला सादर केला असता मयत ठेवीदार सभासद यांच्या सोने तारण कर्ज ची रक्कम 37189/-मंजूर करून सदर धनादेश विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या उपस्थितीत त्यांच्या वारसदार चित्रा बहादुर सिंग कायटे यांना शाखेचे स्थानिक संचालक संतोषजी गिल्डा व गोपालजी चांडक यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.या छोटेखानी कार्यक्रमात उपस्थित खातेदार तसेच शाखेचे कर्मचारी वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे,विभागीय लेखा परीक्षक अनिल बोर्डे,सहाय्यक शाखा व्यवस्थापक योगेंद्र डापके व इतर कर्मचारी उपस्थित होते.

पदवीधर मतदारसंघाच्या मतदानासाठी साहित्याचे वितरण



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना आज वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या कृषी अवजारे निर्मिती, चाचणी व प्रशिक्षण केंद्र येथे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या उपस्थितीत मतदान साहित्याचे वितरण करण्यात येत आहे.

शुक्रवारी, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. परभणी जिल्ह्यातील सर्व पात्र पदवीधर मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे आणि उत्स्फूर्तपणे आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

परभणी सत्यशोधक समाज संघाची 14 व 15 नोव्हेंबर रोजी बैठक

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी** 18 ऑक्टोबर 2026 रोजी परभणी येथे जिजाऊ ज्ञानतीर्थ शाळेत दिवाळी सुट्ट्यांमध्ये मराठवाडा स्तरीय सत्यशोधक समाजाचा 2 दिवसीय निवासी अभ्यास वर्ग तथा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर [Cadre Camp] घेणे संदर्भात नियोजन बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीत खालील प्रमाणे नियोजन झाले ...

1) दि 14 व 15 नोव्हेंबर 2026 (शनिवार, रविवार) रोजी Cadre Camp संपन्न होईल. 2) जिजाऊ ज्ञानतीर्थाचे संस्थापक तथा सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष मा. रामराव लोहोट सरांनी या शिबिरास येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या निवासाची (2 दिवस मुक्काम , 2 नाश्ता, 3 जेवण व 4 चहाची) जबाबदारी वैयक्तिकरित्या स्वीकारली. 3) मराठवाड्यातून परभणी जिल्हा वगळता 50 कार्यकर्ते शिबिरास आणण्याचे नियोजन करण्याचे ठरले. 4) मराठवाडा व्यतिरिक्त विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र उत्तर महाराष्ट्र मधून जवळपास 50 प्रतिनिधी आणण्याचे. 5) परभणी जिल्ह्यातील 100 अभ्यासक शिबिरासाठी आणण्याचे ठरले. 6) 14 तारखेला सकाळी दहा वाजता शिबिर सुरू होईल पहिल्या दिवशी 3 (सत्र) दुसऱ्या दिवशी 3 अभ्यास वर्ग (सत्र) असे एकूण 6 सत्र होतील होतील. 7) रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होईल (शाहीर भारत मुंजे यांच्या नेतृत्वात)

या बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते. : रामराव लोहट, एन आय काळे, एन जी खंडारे, रंगनाथराव चोपडे , डॉ. सुनील जाधव बलभीम मातेले, सखाराम बिडगर, माने विकास , अशोकराव पुंड, सोपान मोरे, सूर्यकांत मोगल, सुशांत भिसे, राजू गांधारे, एडवोकेट एल आर साबळे, सुरेश प्रधान व मिटिंगसाठी खास छत्रपती संभाजीनगर येथून अरविंद खैरनार आदी मान्यवर परभणी येथे होणारे सत्यशोधक समाजाचे पहिले मराठवाडास्तरीय शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्वांनी किमान 20 अभ्यासक/ कार्यकर्ते आणण्यासाठी तसेच आर्थिक सहयोग निधी जमा करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे एकमताने ठरले.

बाल वयात मुलावर सुसंस्कार घडणे महत्त्वाचे : लीना जाधव



हिंगोली : येथील ज्ञानसाधना अन्नपूर्णा इंग्लिश स्कूल मध्ये आम्ही जरंगे या चित्रपटातील जरांगे पाटील यांच्या बहिणीची भूमिका साकारणाऱ्या सिने अभिनेत्री तसेच लावण्य ब्युटी पार्लरच्या संचालिका शिवशक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा लीना जाधव यांच्या एक दिवसीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लीना जाधव उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की बालवयातच विद्यार्थी वर सुसंस्कार घडवणे महत्त्वाचे आहेत. आणि ते सुसंस्कार आई-वडिलांनंतर गुरुजी बालमनावर विद्यार्थ्यांच्या संस्कार घडवतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गुरुजींच्या आदर नेहमी करावा.

गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे अभ्यासात सातत्य ठेवून आई-वडिलांचे नाव रोशन करावे बाल वयातच नव्हे तर जीवनात कधीच कुणीही व्यसनाच्या अधीन जाऊ नये असेही यावेळी लीना जाधव म्हणाल्या यावेळी कार्यक्रमास प्रिन्सिपल रेड्डी सर सेमी सेमी स्कूलचे प्रिन्सिपल दास सर सुमित्रा मॅडम स्वाती मॅडम सविता मॅडम चंदा मॅडम मनीषा मॅडम यांच्यासह शाळेतील विद्यार्थी सर्व स्टॉप कार्यक्रमाचे उपस्थित होता. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रिन्सिपल यांच्या हस्ते लीना जाधव यांचा यथोचित सत्कार करण्यात आला

शुक्रवारी आठवडी बाजार बंद

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (जिमाका) - ५ औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि.२३ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शुक्रवार दि. २३ रोजी म्हणजेच मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी जारी केले आहेत. मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद ठेवावेत. पुढे ढकलल्यास ते अन्य दिवशी भरविण्यात यावेत, असे आदेशात नमूद केले आहे.

तणांच्या प्रभावी नियंत्रणासाठी 'टेम्बोट्रैक्स' सादर

नवी दिल्ली : भारतातील आघाडीच्या कृषी-निविष्ठा कंपन्यांपैकी एक असलेल्या धानुका एग्रीटेक लिमिटेडने भारतातील प्रमुख कृषी क्षेत्रांमध्ये मका आणि ऊस पिकांतील तण व्यवस्थापनासाठी 'टेम्बोट्रैक्स' हे तणनाशक सादर केले आहे. टेम्बोट्रिओन 34.4% एससीहा सक्रिय घटक असलेले हे तणनाशक पिकांच्या उगवणीनंतरच्या सुरुवातीच्या टप्प्यातील तण नियंत्रणासाठी वापरण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. टेम्बोट्रैक्स हे प्रणालीगत एचपीपीडी -प्रतिबंधक तणनाशक आहे. ते तणांमधील कॅरोटिनॉइडच्या जैवसंश्लेषण प्रक्रियेत अडथळा निर्माण करते.

श्री संभाजी विद्यामंदिर, हिंगोली येथे मराठी विषयाच्या आंतरवासिता (OJT) प्रशिक्षणाचा शुभारंभ

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान व कौशल्य विकासाची संधी

हिंगोली प्रतिनिधी/गोपाल सातपुते



हिंगोली येथील पंचशील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री संभाजी विद्यामंदिर प्राथमिक व माध्यमिक शाळेत आदर्श महाविद्यालय, हिंगोली येथील बी.ए. तृतीय वर्षाच्या मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित आंतरवासिता प्रशिक्षणाचा (OJT) शुभारंभ गुरुवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत आयोजित हे प्रशिक्षण दिनांक २२ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत होणार आहे.

माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. बी. ए. वऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात सुरुवातीला प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा परिचय करून घेण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. महेश मंगनाळे यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे स्वरूप, उद्दिष्टे आणि त्याचे महत्त्व याविषयी माहिती दिली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. बी. ए. वऱ्हाड म्हणाले की, पुस्तकी ज्ञानाला व्यावहारिक अनुभवाची जोड मिळते, तेव्हाच शिक्षणाचे खऱ्या अर्थाने कौशल्यात रूपांतर होते. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तके वाचणे, परीक्षा देणे आणि पदवी मिळवणे नव्हे, तर प्राप्त ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करता येणे होय. आजच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक ज्ञानासोबतच संवादकौशल्य, निर्णयक्षमता, वेळेचे व्यवस्थापन, संघभावना आणि आत्मविश्वास यांसारखी कौशल्ये विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. आजच्या काळात केवळ पदवीधारक नव्हे, तर कौशल्यसंपन्न, अनुभवसमृद्ध आणि जबाबदारीने काम करणारे विद्यार्थी समाजाला व उद्योगजगताला अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. सुरेश लेकुळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आंतरवासिता प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. तसेच भविष्यातील रोजगाराच्या संधी ओळखणे, स्वतःच्या क्षमतांचा विकास करणे आणि आत्मनिर्भर बनण्याच्या दिशेने वाटचाल करणे शक्य होते. विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून उपलब्ध संधींचा पुरेपूर उपयोग करावा आणि आपल्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी डॉ. लक्ष्मण सोळंके यांनी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना, या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला कौशल्याची, कौशल्याला अनुभवाची आणि अनुभवाला यशाची जोड मिळो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अतुल करवंदे यांनी केले, तर विद्यार्थिनी पल्लवी खंदारे हिने उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी पल्लवी चोपडे, प्रज्ञा जमदाडे, सरिता कोल्हे, साक्षी सातपुते, सुमन सोनटक्के, भाग्यश्री वायफळे आणि पल्लवी खंदारे यांच्यासह शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आंतरवासिता प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शैक्षणिक वातावरणाचा अनुभव मिळणार असून, त्यांच्या व्यावसायिक कौशल्य विकासाला चालना मिळणार आहे.

जखमी इसमाला मदत करुन जीव वाचविल्याबद्दल होमगार्ड विलास भवर यांचा गौरव



फर्दापूर प्रतिनिधी : कर्तव्य बजावत असताना जखमी इसमाला तातडीने मदत करून त्याचा जीव वाचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे सोयगाव येथील होमगार्ड विलास काशिनाथ भवर यांचा उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सिल्लोड यांच्याकडून प्रशंसापत्र देऊन गौरव करण्यात आला

विलास भवर हे सोयगाव पोलीस ठाण्यात बंदोबस्ताचे कर्तव्य बजावत असताना एक जखमी Isam त्यांच्या निदर्शनास आला परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तत्परतेने मदत केली आणि जखमी इसमाला रुग्णालयात दाखल करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली त्यांच्या या समयसूचकतेमुळे आणि मदतीमुळे जखमी इसमाचा जीव वाचण्यास मदत झाली भवर यांनी दाखविलेली कर्तव्यनिष्ठा मानवतावादी दृष्टिकोन आणि प्रसंगावधान प्रशंसनीय असल्याचे प्रशंसापत्रात नमूद करण्यात आले आहे त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकडून त्यांचे कौतुक करण्यात आले असून भविष्यातही त्यांनी अशाच प्रकारे कर्तव्य बजावावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे

नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करावा :आ.अब्दुल सत्तार



सिल्लोड (प्रतिनिधी), दि. २२ : सिल्लोड-सोयगाव तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती १९७२ च्या दुष्काळापेक्षाही गंभीर असल्याचे चित्र असून, आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी केले आहे. संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आतापासूनच पाण्याची बचत करणे, उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यासंदर्भात आमदार अब्दुल सत्तार यांनी नागरिकांना दैनंदिन वापरात पाण्याची बचत करण्याचे आवाहन केले आहे. नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये, पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा, तसेच तलाव, विहिरी आणि अन्य पारंपरिक जलस्रोतांचे संरक्षण करून त्यांचे प्रदूषण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

आपत्कालीन परिस्थितीसाठी पाणीसाठा राखीव ठेवण्याचे महत्त्व : उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करणे ही काळाची गरज आहे. प्रमुख जलाशयांतील उपलब्ध जिवंत पाणीसाठ्यापैकी आपत्कालीन परिस्थितीसाठी राखीव ठेवण्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने या साठ्याचा वापर केवळ अत्यावश्यक परिस्थितीत पिण्याच्या पाण्यासाठीच करण्यात यावा. सर्वसाधारण वापरासाठी या साठ्याचा विनियोग करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

डॉक्टर होणे म्हणजे रुग्णांचा विश्वास संपादन करणे; डॉ. शिवाजी सुक्रे यांचा विद्यार्थ्यांना सेवाभावाचा मंत्र

घाटीत प्रथम वर्ष एमबीबीएस विद्यार्थ्यांचा 'डीन ॲड्रेस व स्वागत समारंभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टर होणे म्हणजे केवळ पदवी मिळविणे नव्हे, तर रुग्णांचा विश्वास संपादन करणे, त्यांच्या वेदना समजून घेणे आणि समाजाप्रती जबाबदारीने सेवा करणे होय, असे प्रतिपादन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'डीन ॲड्रेस व स्वागत समारंभात' ते बोलत होते. बजाज अध्यापन संकुलात झालेल्या या कार्यक्रमातून नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणाच्या नव्या प्रवासाला सुरुवात झाली.



वैद्यकीय शिक्षणात शिस्त, सातत्यपूर्ण अभ्यास, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिक मूल्ये आणि रुग्णसेवेतील संवेदनशीलता महत्त्वाची आहे. घाटी रुग्णालयासह राज्य कर्करोग रुग्णालय आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रुग्णांच्या अभ्यासाची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. या संधीचा पुरेपूर लाभ घेत सक्षम, कुशल आणि संवेदनशील डॉक्टर बनावे, असे आवाहन डॉ. सुक्रे यांनी केले. विद्यार्थ्यांना यावेळी ॲप्रॉन व शैक्षणिक पुस्तके देण्यात आली. डॉक्टरांचा पांढरा कोट ही समाजाप्रती मोठी जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जीवरसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका व आयोजक डॉ. शिल्पा आसेगावकर यांनी विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी असणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना या संधीचे सोने करण्याचे आवाहन केले. शरीररचनाशास्त्र, शरीरक्रियाशास्त्र, जीवरसायनशास्त्र आणि कम्युनिटी मेडिसिन या विषयांचे महत्त्वही त्यांनी विशद केले.

पदवीपूर्व उपअधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा यांनी 'सुक्रे पॅटर्न'मुळे महाविद्यालय व वसतिगृहात सकारात्मक बदल झाल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी अधिष्ठाता व प्रशासन तत्पर असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. प्रसाद देशपांडे यांनी ताणतणाव व्यवस्थापनासाठी विद्यार्थ्यांनी 'व्यक्त व्हा, मुक्त व्हा' हा दृष्टिकोन ठेवून गरजेनुसार मदत घ्यावी, असे सांगितले. रॅगिंगविरोधी समितीचे प्रमुख डॉ. भारत सोनवणे यांनी महाविद्यालय व वसतिगृह परिसर रॅगिंगमुक्त ठेवण्यासाठी आवश्यक काळजी घेतली जात असल्याचे सांगून पालकांना आश्वस्त केले.

डॉ. लिंगायत यांनी प्रथम वर्षाचे विषय केवळ परीक्षेपुरते मर्यादित न ठेवता भविष्यातील चिकित्सालयीन ज्ञानाचा पाया म्हणून अभ्यासण्याचे आवाहन केले. शरीरक्रियाशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली शेटे, शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. स्वप्ना आंबेकर आणि कम्युनिटी मेडिसिन विभागप्रमुख डॉ. स्मिता अंदुरकर यांनीही विषयांचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाला पदव्युत्तर उपअधिष्ठाता डॉ. गायत्री तडवळकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, डॉ. सिराज बेग, डॉ. सुचेता जोशी, डॉ. सरोजिनी जाधव, डॉ. सुनील देशमुख, डॉ. प्रभा खैरे, डॉ. काशिनाथ गर्गळ यांच्यासह विविध विभागांचे प्राध्यापक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

ईसारवाडीत 120 जणांची नेत्रतपासणी; 55 रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड

एमजीएमतर्फे मोफत नेत्र तपासणी शिबिर; रुग्णांवर मोफत उपचार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर आणि माऊली बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ईसारवाडी (ता. पैठण) येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिरात १२० नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली, तर त्यापैकी ५५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली.

एमजीएम रुग्णालयाच्या नेत्र विभागप्रमुख डॉ. सारिका गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तपासणीदरम्यान



मोतीबिंदूचे निदान झालेल्या ५५ रुग्णांवर एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पुढील उपचारांसह मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

या शिबिरासाठी नेत्र विभागातील डॉ. रुपाली सक्सेना, डॉ. प्रिया मिश्रा, समुपदेशक उज्वला भगत व सुमित गवळी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच बाबासाहेब बोबडे, भरत खोंडे, अनिल देशमुख, संतोष शेजुळ, विठ्ठला आव्हाड, दीपक बोबडे, कृष्णा विठ्ठल बोबडे, विकास पाचोडे, मारुती बोबडे, आप्पा दादा आणि सोपान कल्याण बोबडे यांनी सहकार्य केले.

ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये नेत्र आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि गरजू रुग्णांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. एमजीएमच्या नेत्र विभागामार्फत डॉ. सारिका गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

कापसाला मिळाला उच्चांकी 9701 रुपयांचा भाव; लिमला येथे कापूस खरेदीचा शुभारंभ

हमीभाव पेक्षा जास्त दर मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाची लाट

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

परभणी**परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यातील ताडकळस येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे अंतर्गत येत असलेल्या निमला येथील विराज कोटेक्स जिनिंग मध्ये विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर 20 ऑक्टोबर मंगळवार रोजी कापूस खरेदीचा शुभारंभ सभापती बालाजी रुद्रवार यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी काटा पूजन करून कापसाला तब्बल 9701 रुपये प्रति क्विंटल असा उचांकी भाव देण्यात आला पहिल्याच दिवशी सुमारे 100 क्विंटल 64 किलो कापसाची खरेदी झाली.

हमीभाव पेक्षा अधिकचा दर मिळाल्याने दुष्काळाच्या परिस्थितीत बळीराजाच्या चेहऱ्यावर सुख समाधान व आनंदात वातावरण पाहायला मिळाले या कार्यक्रमास उपसभापती अंकुशराव शिंदे संचालक पंडितराव जाधव अंकुशराव जोगदंड बाळासाहेब पवार देवानंद नावकीकर अजित वरपूडकर नरहरी रुद्रवार नंदकिशोर मुंदडाबापूराव अंभोरे बाजार समितीचे सचिव शंकर देशमुख मुंजाभाऊ कुकर चेअरमन दामोदर शिंदे जिनिंग मालक रोशन कुमार चौधरी व अग्रवाल ग्रेडर रोहित कुमार शर्मा संजय गुंडाळे गोविंद आवरगंड गजानन काळे विठ्ठल शिंदे पांडुरंग शिंदे शेख मोहम्मद रामभाऊ गाडेकर आदींची उपस्थिती होती. यावेळी पावसाभावी भीषण दुष्काळाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत असल्यामुळे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वांनी दिलासा देण्यासाठी प्रयत्नशील राहणारे सभापती बालाजी रुद्रवार यांनी यावेळी जिनिंग मालकाकडून करण्यात येत असलेला सत्कार न स्वीकारता शेतकऱ्यांच्या कापसाला जास्तीत जास्त भाव देऊन त्यांना सन्मानाने वागणूक द्यावी हाच मोठा सत्कार असल्याची प्रतिक्रिया सभापती बालाजी रुद्रवार यांनी दिली.

कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द करा; दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आठवडाभरात दिलासा द्या!

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, दिवाळीच्या तोंडावर बळीराजाला दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने मदत करावी. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करून आठवडाभरात निर्णय घ्यावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शेतकरी सेनेचे जिल्हासंघटक बाबासाहेब पाटील मोहिते यांनी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास शासकीय कार्यालये, बँका आणि सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या घरासमोर दिवाळी साजरी करण्याचा इशाराही त्यांनी दिला.



कन्नड तालुक्यातील अंधानेर, उपळा, कालीमठ आणि वडनेर येथील शेतकरी, बँक निरीक्षक व शाखाधिकाऱ्यांची बैठक घेऊन कर्जमुक्ती योजनेतील अडचणी आणि उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. यावेळी तालुकाप्रमुख गणेश शिंदे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. जिल्हा मध्यवर्ती बँक, सोसायट्या, खासगी बँका आणि वित्तीय संस्थांनीही जाचक अटींचा फेरविचार करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी करण्यात आली.

कन्नड तालुक्यात जिल्हा बँकेच्या १४ हजार २७७ शेतकऱ्यांपैकी ११ हजार ७७१ शेतकऱ्यांची माहिती अपलोड झाली आहे. उर्वरित २ हजार ५०६ शेतकऱ्यांना कर्जमाफी किंवा चालू बाकीदार म्हणून मिळणाऱ्या लाभापैकी कोणताही लाभ मिळालेला नसल्याचा दावा शेतकरी सेनेने केला आहे. ही आकडेवारी केवळ जिल्हा बँकेची असून, इतर बँकांतील वंचित शेतकऱ्यांची संख्या आणखी मोठी असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

सहकार विभागाच्या ३० सप्टेंबर २०२५ च्या यादीनुसार थकबाकीदार असूनही दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्जाच्या कारणास्तव काही शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. कर्जवाटप दिनांकाची अट रद्द करून सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच चालू बाकीदार शेतकऱ्यांसाठी मागील दोन ते तीन वर्षे नियमित भरणा करण्याची अट व सक्ती रद्द करून सर्व पात्र खातेदारांना लाभ द्यावा, अशी भूमिका मांडण्यात आली.

वयामुळे किंवा अन्य कारणांमुळे बोटांचे ठसे उमटत नसलेल्या शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडीची अट शिथिल करावी. शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार तहसीलदारांना द्यावा. कर्ज घेताना जमीन असलेल्या; मात्र नंतर जमीन विकलेल्या मूळ शेतकऱ्यांची तहसीलदारांमार्फत पडताळणी करून त्यांनाही नियमानुसार कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली. जिल्हाभरातील वंचित शेतकऱ्यांची माहिती संकलित करून प्रत्येक शेतकऱ्याला लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे मोहिते यांनी सांगितले.

शेतीच्या वादातून दुहेरी हत्याकांड; पत्नीचा मृत्यू पतीचीप्रकृती चिंताजनक

दाम्पत्यावर लोखंडी रोड कोयता आणि लोखंडी पाईपाने केला हल्ला

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

परभणी**परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील ही घटना शेतीच्या वादातून निर्माण झालेल्या भावकीतला वाद वयमनस्याचे पर्या वसण रक्तरंजित हल्लाबोल होऊन झालेल्या हल्ल्यामध्ये खेरडा येथे एका महिलेचा जागीच बळी गेला तर तिच्या पतीची मृत्यूची झुंज चालू आहे ही घटना दिनांक 19 ऑक्टोबर रात्री पाथरी तालुक्यातील खेरडा येथे घडलेल्या. दुहेरी हत्याकांडाने खेरडागावासहगावासह संपूर्ण तालुक्यामध्ये मोठी खळबळून आणली असून या प्रकरणातील तिन्ही आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक केली असून न्यायालयाने त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

अधिक माहिती अशी की

उर्मिला लक्ष्मण सीताफळे वय 42 वर्षे असे मयत महिलेचे नाव असून महिलेचा पती लक्ष्मण सीताफळे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती दिली आहे पोलिसांनी याबाबत पोलिसात फिर्याद दाखल फिर्यादीनुसार दिनांक 19 ऑक्टोबर सोमवार रोजी शेतातील सोयाबीनचा लीग जाळण्याच्या कारणावरून हा वाद निर्माण झाला ने शेत रस्त्याच्या प्रश्नावरूनही पूर्वीच्याच संबंधितांमध्ये वाद असल्याने दिवसभरातील वादा नंतर रात्री सुमारे सात वाजून पन्नास मिनिट वाजण्याच्या सुमारास खेर्डा येथे लक्ष्मण आणि उर्मिला सीताफळे यांच्यावर प्राणघात घालला झाल्याची माहिती गावातील एका व्यक्तीने फिर्यादी मिरासीताफळ यांच्या फोनवरून दिली ही बातमी समजताच मीरा यांनी खेडा गावाकडे धाव घेतली आणि तेथे तुकाराम पुंडलिक सिताराम सीताफळे यांच्या घरासमोरील रस्त्यावर लक्ष्मण आणि उर्मिला हे दोघेही रक्ताच्या थारोळ्यामध्ये पडलेले दिसले दोघांच्या शरीरात वर गंभीर जखमा झाल्या तर गंभीर जखमेमुळे उर्मिलाबाई जागेवरच गतप्राम झाल्या होत्या तर लक्ष्मणराव हे बेशुदावस्थेमध्ये पडलेले होते

फिर्यादीतील आरोपानुसार तुकाराम कुंडलिकराव सिताराम फळ सिताफळे यांनी कोयत्याने वैजनाथ पुंडलिकराव सिताफळ याने लोखंडी पाईप ने तर लक्ष्मीबाई कुंडलिक सीताफळ यांनी लोखंडी स्थळ गजाने या दोघांवर हल्लाबोल केला या हल्ल्यात त्यांच्या डोक्यावर गळ्यावर मानेवर हातावर तसेच शरीराच्या इतर भागात वर ही वार करण्यात आले चे तक्रारीत म्हटले आहे घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली गावातील नागरिकांनी नागरिकांच्या मदतीने दोन्ही गंभीर जखमी त्यांना पात्री येथील वरद हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले दरम्यान उर्मिलाबाई सीताफळे यांची मृत्यूशी असलेली झुंज अपयशी ठरली उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला व दुसरीकडे पती लक्ष्मणराव सिताराम सीताफळे यांचे प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत याप्रकरणी तिन्ही आरोपींना अटक चार दिवसाची पोलीस कोसळी कोठडी याप्रकरणी मीरा माणिक सिताफळे यांच्या फिर्यादीवरून पाथरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून उर्मिला सीताफळ यांचा मृत्यू नंतर पोलिसांनी गुन्ह्यात खुनाच्या कलमांची वाढ केली आहे हल्ल्यात वापरण्यात आलेल्या कोयता ही जप्त करण्यात आला असून हत्यार कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. या हत्याकांडातील तीनही आरोपींना पोलिसांनी अटक करून 20 ऑक्टोबर मंगळवाररोजी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे शेतीच्या वादातून घडलेल्या तरक्तरंजित घटनेचा पुढील तपासतपास पाथरी पोलीस करत आहेत.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांचा चारा, पाण्याचे नियोजन करा

कृषी समितीच्या सभेत उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा व पाण्याचे योग्य नियोजन करावे, तसेच भूजल पातळी वाढविण्यासाठी गावठाणातील पडीक जागांवर जलतारा प्रकल्प राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचना जिल्हा परिषद कृषी समितीचे सभापती तथा उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनी दिल्या.

जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे बुधवारी (दि. २१) उपाध्यक्षांच्या दालनात कृषी समितीची मासिक सभा झाली. या सभेत जिल्ह्यातील कृषी विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. दुष्काळाच्या अनुषंगाने उपाययोजनांवर चर्चा करताना



गावस्तरावर जनावरांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी हौद व पाणवठे तयार करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना जैस्वाल यांनी केल्या.

पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध जलस्रोतांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे सांगून, खासगी पाणी उपसा सुरू असलेल्या प्रकल्पांवर नियंत्रण आणून अनधिकृत किंवा नियमबाह्य पाणी उपसा थांबविण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन करण्यावरही भर देण्यात आला.

या सभेला समितीचे सदस्य गीतांजली पाथ्रीकर, आयेशाबेगम सय्यद, स्वाती पाटेकर, उत्तम चव्हाण, सुप्रिया अनिलकुमार घुगे, कल्याण गायकवाड, अर्जुन पाटील, प्रकाश पाटील तसेच जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील व कृषी विभागातील अन्य अधिकारी उपस्थित होते.

ज्योतीनगरात श्रीलक्ष्मी व्यंकटेश पद्मावती कल्याणोत्सव विवाहसोहळा उत्साहात

'गोविंदा-गोविंदा'च्या गजरात आणि ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात भक्तिमय वातावरण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर ज्योतीनगर येथील श्रीविठ्ठल मंदिरात भगवान श्रीलक्ष्मी व्यंकटेश पद्मावती यांचा कल्याणोत्सव विवाहसोहळा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. सलग १७ व्या वर्षी आयोजित या सोहळ्यात 'गोविंदा-गोविंदा'चा गजर, ब्रह्मवृंदांचे मंत्रोच्चार, सनई-चौघडा आणि ढोल-ताशांच्या निनादाने परिसर भक्तिमय झाला होता.

यानिमित्त पहाटे यंदाचे यजमान श्रीकांत मणियार यांच्या निवासस्थानी श्रीकांत व रुपालीदेवी मणियार, संजय व सरीना सारडा तसेच बालाप्रसाद व पद्मा झवर या दाम्पत्यांच्या हस्ते भगवंतांच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला.





सायंकाळी सहा वाजता मोहिनी जहागीरदार यांच्या निवासस्थानी भगवंतांची पंचोपचार पूजा व नैवेद्य-आरती झाल्यानंतर मुख्य पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. सनई-चौघडा, ढोल-ताशे, टाळकऱ्यांसह भाविकांच्या 'गोविंदा-गोविंदा'च्या जयघोषात निघालेल्या पालखीचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. भाविकांनी सडा-रांगोळ्या, फुलांच्या पायघड्या, दीपप्रज्वलन आणि फटाक्यांच्या आतषबाजीत पालखीचे औक्षण केले. ज्योतिमंदिरात विश्वस्त व भाविकांनी सामूहिक आरती करून पालखीचे स्वागत केले.

रात्री आठ वाजता पालखी श्रीविठ्ठल मंदिरात पोहोचल्यानंतर माजी नगरसेविका सुमित्रा हळनोर यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक वेशभूषेतील १०१ सुवासिनींनी पालखीचे औक्षण केले. सोहळ्याचे मुख्य संयोजक माजी नगरसेवक गिरजाराम हळनोर यांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले.

मंदिरातील विविध देवतांच्या उत्सवमूर्तींची भेट घडवून आणल्यानंतर तिरुपतीच्या धर्तीवर सजविलेल्या विवाह मंडपात मुख्य कल्याणोत्सव सोहळा पार पडला. आरतीनंतर भाविकांना तिरुपती बालाजीचा लाडू प्रसाद आणि पाच प्रकारच्या भातांचा प्रसाद वाटप करण्यात आला. महाप्रसाद व स्नेहभोजनाचा सुमारे दोन हजार भाविकांनी लाभ घेतला.

पाण्याचा काटकसरीने वापर करा पैठण उपविभागीय अधिकारी यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (जिमाका)- दुष्काळ सदृश्य परिस्थिती लक्षात घेता, आगामी काळात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता पुरेशी रहावी, यासाठी नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन पैठण-फुलंब्रीच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांनी केले आहे.

याबाबत त्यांनी आवाहन केले आहे की,नागरिकांनी दैनंदिन वापरात पाण्याची बचत करावी, नळ सुरू ठेवणे व पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. घरगुती व सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्थेत गळती आढळल्यास संबंधित ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला त्वरित कळवावे. बागकाम, परिसर स्वच्छता आदी कामांसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर टाळून शक्य तेथे पाण्याचा पुनर्वापर करावा. तलाव, विहिरी व अन्य पारंपरिक जलस्रोतांचे संरक्षण करून त्यांचे प्रदूषण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

प्रमुख जलाशयांतील उपलब्ध जिवंत पाणीसाठ्यापैकी किमान १० टक्के साठा आपत्कालीन परिस्थितीसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. हा साठा केवळ अत्यावश्यक परिस्थितीत पिण्याच्या पाण्यासाठी वापरता येईल. सर्वसाधारण वापरासाठी त्याचा विनियोग करता येणार नाही. धरणे, कालवे, नद्या, तलाव व सार्वजनिक जलस्रोतांमधून अनधिकृत पाणी उपसा करू नये. अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस व जलसंपदा विभागाची संयुक्त पथके स्थापन करण्यात आली आहेत. अनधिकृत पाणी उपसा करताना आढळल्यास विद्युत पंप, पाइपलाइन व अन्य साहित्य जप्त करण्यासह प्रचलित कायदे व नियमांनुसार संबंधितांविरुद्ध फौजदारी व दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा ही त्यांनी दिला आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911